# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/०८/२०२४ (शनिवार) सकाळ**


---

## पोस्टे बुट्टीबोरी व खापरखेडा हद्दीत आगामी काळात येणारे सण पोळा, तान्हा पोळा, गणेश उत्सव संबंधाने शांतता कमिटी सदस्य बैठक संपन्न

दिनांक ३१/०८/२०२४ रोजी पोलीस स्टेशन बुट्टीबोरी हद्दीमध्ये आगामी काळात साजरे करण्यात येणारे सण पोळा, तान्हा पोळा, गणेश उत्सव संबंधाने शांतता कमिटी सदस्य, गणेश मंडळाचे पदाधिकारी, गावातील, प्रतिष्ठित नागरिक यांची पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथील हॉलमध्ये मीटिंग घेण्यात आली. सन उत्सव दरम्यान शांतता राखावी कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही. याबाबत सूचना देण्यात आल्या.

तसेच पोलीस स्टेशन खापरखेडा येथे आगामी सण पोळा तन्हा पोळा गणेश उत्सव, ईद मिलाद, निमित्त पोलीस पाटील यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये उत्सव आनंदात व शांततेने पार पाडण्याचे दृष्टिकोनातून सर्व आयोजक यांना नियम व अटीचे पालन करून उत्साह साजरा करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे अशी सूचना देण्यात आली तसेच गावात कायदा व सुव्यवस्था राखण्याचे दृष्टिकोनातून मार्गदर्शन करण्यात आले.

सदरची शांतता कमिटीची बैठक ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे बुट्टीबोरी येथील ठाणेदार पोनि प्रतापराव भोसले तसेच पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोनि अरविंदकुमार कतलाम यांनी पार पाडली.







पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर